महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
४था मजला, प्रकाशगड, स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१
Tel.: २६४२ २२११ / २६४७ २१३१ Tlx.: ०११-७८२९३ / ९४ MSEB IN Fax : ०२२-२६४७६७४९ Gram : MUMBAIGRID Mumbai
Email : gmntestt@mahadiscom.in Email: smkalewad@mahadiscom.in website : www.mahadisciom.in

क्र.मासंवि/मव्य(मासं/अतां-आस्था)/ No 02820 दि. 1 FEB 2012

# परिपत्रक

**विषय :- कामावर असताना गणवेश परिधान करणेबाबत.**
**संदर्भ :-** १. प्रशासकीय परिपत्रक क्र. २२७ दि. .३१.०७.१९९७.
२. परिपत्रक क्र. साप्रवि/सामान्य/गणवेश/१७२१ दि. १०.०६.१९९९.

-------------

संदर्भिय परिपत्रकान्वये कंपनीतील वेतन गट ३ व ४ मधील ज्या पात्र पुरूष व महिला कर्मचाऱ्यांना गणवेश पुरविण्यात आलाआहे, त्यांनी तो गणवेश कंपनीच्या कार्यालयीन / कामकाजाच्या वेळेत परिधान करण्याबाबत व जे कर्मचारी गणवेश परिधान करीत नाहीत अशा कर्मचाऱ्यांविरुध्द काय कार्यवाही करावी याबाबतच्या सविस्तर सुचना / निर्देश सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत. असे असुनही, ज्या सांघिक कार्यालयातील व क्षेत्रिय कार्यालयातील वेतन गट ३ व ४ मधील पात्र पुरुष व महिला कर्मचाऱ्यांना गणवेश पुरविण्यात आलेला आहे ते कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत / डयुटीवर असताना परिधान करीत नाहीत व स्वच्छ , निटनेटक्या अवस्थेत ठेवत नाहीत असे निदर्शनास आले आहे. ही बाब गंभीर स्वरुपाची असुन यापूर्वी वेळोवेळी देण्यात आलेल्या निर्देशाचा भंग करणारी आहे.

सबब, सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांना याद्वारे पुनःश्च असे निर्देश देण्यात येत आहेत की, ज्या वेतन गट ३ व ४ मधील पात्र कर्मचाऱ्यांना गणवेश पुरविण्यात आलेला आहे त्यांनी कार्यालयीन वेळेत कामावर असताना गणवेश परिधान न केल्यास यापूर्वी संदर्भिय (२) मधील परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशानुसार शिस्तभंगाची व दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी तसचे त्यांना दरमहा मिळणारा धुलाई भत्ता अदा करण्यात येऊ नये.

सदर सुचना सांघिक कार्यालयातील व क्षेत्रीय कार्यालयातील सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वेतन गट ३ व ४ मधील जे गणवेश परिधान करण्यास पात्र आहेत अशा कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

9/2/2012
(विजय भि. बागुल)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

प्रति,
सांघिक व श्रेत्रीय कार्यालयातील सर्व नियंत्रण अधिकारी यांना.